**वाचले**:- १) महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम २०१०

२) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग दिनांक ०६ ऑगस्ट २०१२ ची अधिसूचना

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
स्थानिक संस्था कर विभाग
क्र.स्थासंक/६/कावि/ ५३० /२०१४
दिनांक - ०२/ ७ /२०१४

**विषय- महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम २०१० मधील नियम २७ नुसार ठोक प्रदानाने स्थानिक संस्था कर भरणेकामी परवानगी देणेबाबत**

**परिपत्रक,**

दिनांक ०१ एप्रिल २०१३ पासून स्थानिक संस्था कराची अंमलबजावणी सुरु झाली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम २०१० मधील नियम २७ (१) (२) (३) मधिल तरतूदीनुसार नोंदणीकृत व्यापाऱ्याची वर्षभरातील उलाढाल दहा लाखापेक्षा कमी असेल तर अशा व्यापाऱ्यास खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ठोक रक्कमेने स्थानिक संस्था कर भरण्याचा पर्याय नमुना 'द' मधिल प्रतिज्ञापत्र सादर करुन स्विकारता येत असलेबाबत तरतूद आहे.

| **टप्पा क्र.** | **वर्षभरातील सर्व खरेदीची उलाढाल** | **दर वर्षी प्रदेय असलेला स्थानिक संस्था कर (रुपये)** |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | रु. १,००,०००/- पर्यंत | काही नाही |
| २ | रु. १,००,०००/- पेक्षा अधिक परंतू, रु. २,००,०००/- पेक्षा अधिक नसेल | ४,०००/- |
| ३ | रु. २,००,०००/- पेक्षा अधिक परंतू, रु. ३,००,०००/- पेक्षा अधिक नसेल | ६,०००/- |
| ४ | रु. ३,००,०००/- पेक्षा अधिक परंतू, रु. ४,००,०००/- पेक्षा अधिक नसेल | ८,०००/- |
| ५ | रु. ४,००,०००/- पेक्षा अधिक परंतू, रु. ५,००,०००/- पेक्षा अधिक नसेल | १०,०००/- |
| ६ | रु. ५,००,०००/- पेक्षा अधिक परंतू, रु. ६,००,०००/- पेक्षा अधिक नसेल | १२,०००/- |
| ७ | रु. ६,००,०००/- पेक्षा अधिक परंतू, रु. ७,००,०००/- पेक्षा अधिक नसेल | १४,०००/- |
| ८ | रु. ७,००,०००/- पेक्षा अधिक परंतू, रु. ८,००,०००/- पेक्षा अधिक नसेल | १६,०००/- |
| ९ | रु. ८,००,०००/- पेक्षा अधिक परंतू, रु. ९,००,०००/- पेक्षा अधिक नसेल | १८,०००/- |
| १० | रु. ९,००,०००/- पेक्षा अधिक परंतू, रु. १०,००,०००/- पेक्षा अधिक नसेल | २०,०००/- |

सदर तरतूदीचे अनुषंगाने र.रु. १० लाखाचे आतील वार्षिक उलाढाल असलेल्या नोंदणीकृत व्यापाऱ्यांकरीता स्थानिक संस्था कराची ठोक रक्कम प्रदान करणे संबंधी दाखल झालेल्या अर्जावर स्थानिक संस्था कर ठोक रक्कमेने प्रदान करणेस परवानगी देणेबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती अंमलात राहील.

**१) स्थानिक संस्था कराचे ठोक रकमेचे प्रदानासंबधी जोडावयाची कागदपत्रे -**

१. नमुना 'द' मधिल रुपये १०/- चे कोर्ट फी स्टॅम्प लावलेला अर्ज.

२. स्थानिक संस्था नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

**२) अटी व शर्ती -**

१. स्थानिक संस्था कराची ठोक रक्कम आदेशात नमुद केलेल्या विनिर्दिष्ट कालावधीत अर्जदाराने भरणा करुन त्याची पावती/चलन स्थानिक संस्था कर विभाग यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील. सदर मुदतीत पूर्तता न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्द होईल.

२. स्थानिक संस्था कराची ठोक रक्कम भरणेची परवानगी ज्या आर्थिक वर्षासाठी देणेत आली आहे त्याच आर्थिक वर्षा करीताच लागू राहील. पुढील आर्थिक वर्षाकरीता नव्याने अर्ज करुन अर्जदारास परवानगी घ्यावी लागेल. अन्यथा नियमाप्रमाणे स्थानिक संस्था कर भरणे बंधनकारक राहील.

३. नियम २९ मधील तरतूदीनुसार नमुना 'ड-२' मधील वार्षिक विवरणपत्र सादर करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

४. नियम २७ (२) मधील तरतूदी नुसार वर्षा भरातील सर्व खरेदीची उलाढाल वाढल्यास फरकाची प्रदेय स्थानिक संस्था कराची रक्कम भरणे अर्जदारास बंधनकारक राहील.

५. अर्जदाराने अटी शर्तीचा भंग केल्याचे आढळून आल्यास नियम ४८ नुसार कारवाई केली जाईल.

वरिल प्रमाणे वर्षभरातील उलाढाल रुपये दहा लाखापेक्षा कमी असलेल्या नोंदणीकृत व्यापाऱ्यांचे ठोक रक्कमेने स्थानिक संस्था कर भरण्याच्या परवानगी देणेबाबतच्या अर्जावर कार्यवाही करणेकामी कार्यपध्दती अंमलात राहील. सदर धोरणानुसार दाखल झालेल्या अर्जावर सहाय्यक आयुक्त, स्थानिक संस्था कर विभाग यांनी पुढील कार्यवाही करावी.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

**प्रत** - सर्व संबधित